**सुचना - चंद्रपूर जिल्हा होमगार्ड नोंदणी कार्यक्रम वेळापत्रक**

चंद्रपूर जिल्हा होमगार्ड सदस्य नोंदणी करीता चंद्रपूर जिल्हयातील ज्या रहिवासी उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज केला आहे. त्यांचेकरीता खालील प्रमाणे नोंदणी कार्यक्रम आयोजीत केलेला आहे. **सदर नोंदणी फक्त चंद्रपूर जिल्यातील रहिवासी उमेदवारांकरीता असून इतर जिल्हयातील ऑनलाईन अर्ज केलेले सर्व उमेदवार सदर नोंदणी करीता अपात्र आहेत. त्यामुळे चंद्रपूर जिल्हा सोडून इतर जिल्हयातील उमेदवारांनी नोंदणी कार्यक्रमाकरीता उपस्थित राहू नये. त्यांना मैदानामध्ये प्रवेश दिला जाणार नाही. तसेच रहिवासी भागातील पथक/उपपथक सोडून इतर पथकात अर्ज केलेले उमेदवार सुध्दा कागदपत्र पडताळणी मध्ये अपात्र ठरतील.**

अर्ज केलेल्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणी, शारीरिक पात्रता व क्षमता चाचणी याकरीता दिनांक २२/०८/२०२४ ते २४/०८/२०२४ या कालावधीमध्ये दररोज सकाळी ०४.०० वाजता खालील प्रमाणे **पोलीस मुख्यालय चंद्रपूर** येथे बोलाविण्यात येत आहे. उमेदवारांना सकाळी ०४.०० ते सकाळी १०.०० या कालावधीमध्येच मैदानात प्रवेश दिला जाईल.

| अ.क्रं. | दिनांक | बोलविण्यात आलेले अर्ज नोंदणी क्रमांक | उमेदवार संख्या |
|---|---|---|---|
| १. | २२/०८/२०२४ | महिला अर्ज नोंदणी क्रं. ०१ ते ६१९७ | १८२५ |
| २ | २३/०८/२०२४ | पुरुष अर्ज नोंदणी क्रं. ०१ ते २९६४ | २१३५ |
| ३ | २४ /०८/२०२४ | पुरुष अर्ज नोंदणी क्रं. २९६६ ते ६२०० | २१३५ |

१. कागदपत्र पडताळणी व शारिरीक क्षमता चाचणी करीता येतांना अर्जासह आवश्यक कागदपत्रांच्या उमेदवारांनी स्वत: स्वाक्षरी केलेल्या छायांकित प्रति अर्जासोबत जोडावी. अर्ज नोंदणीच्या दिवशी स्वत: घेवून यावे. दोन फोटो व मुळ कागदपत्र नोंदणीच्या वेळी पडताळणीकरीता बंधनकारक राहील. उमेदवारांना नोंदणीकरीता स्व:खर्चाने उपस्थित रहावे लागेल, नोंदणी दरम्यान किंवा प्रवासादरम्यान कोणतीही दुखापत झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.

२. उमेदवारांनी कोणत्या किमती वस्तू,मोबाईल इ. आणू नयेत आणि आणल्या तर त्या स्वत:चे जबाबदारावर सांभाळाव्यात. याची कोणतीही जबाबदारी आयोजकांवर राहणार नाही.

**चंद्रपूर जिल्हा होमगार्ड नोंदणी - २०२४**

३. पथक/उपपथक निहाय रिक्त अनुशेष खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्रं** | **होमगार्ड पथक/उपपथक** | **रिक्त जागा** | | **अंतर्गत पोलीस ठाणे** |
|---|---|---|---|---|
| | | **पुरुष** | **महिला** | |
| १. | चंद्रपूर | २३ | ११ | चंद्रपूर शहर, रामनगर, दुर्गापूर, पडोली, घुग्घुस. |
| २. | राजुरा | ०३ | ०६ | राजुरा, गडचांदुर, कोरपना, जिवती, पाटण, टेकामांडवा, पिटटीगुडा, विरुर, भारी. |
| ३. | वरोरा | ०२ | ०५ | वरोरा, शेगांव. |
| ४. | ब्रम्हपुरी | ०२ | ०१ | ब्रम्हपुरी |
| ५. | नागभीड | ०४ | ०३ | नागभीड, तळोधी. |
| ६. | सिंदेवाही | ०० | ०१ | सिंदेवाही, पाथरी. |
| ७. | मुल | ०१ | ०५ | मुल, सावली. |
| ८. | गोंडपिपरी | ०२ | ०२ | गोंडपिपरी, पोंभुर्णा, उमरी पोतदार, लाठी, धाबा. |
| ९. | बल्लारशा | ०६ | ०६ | बल्लारशा, कोठारी. |
| १०. | भद्रावती | ०६ | ०० | भद्रावती, माजरी. |
| ११. | चिमूर | ०२ | ०६ | चिमूर, भिसी. |
| | **एकूण** | **५१** | **४६** | |

**संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार मा.जिल्हा समादेशक,होमगार्ड तथा अपर पोलीस अधिक्षक चंद्रपूर यांना राहील.**

सदर होमगार्ड नोंदणी प्रक्रिया अत्यंत पारदर्शक व इन-कॅमेरा पार पाडण्यात येणार असून होमगार्ड नोंदणी करीता **उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला बळी पडू नये. तसेच शिफारस/वशिला इ. गैरमार्गाचा वापर करु नये. होमगार्ड नोंदणी करीता कोणी पैसे/लाचेची मागणी केल्यास तात्काळ मा. अपर पोलीस अधिक्षक, चंद्रपूर किंवा अधिक्षक लाचलूचपत प्रतिबंधक कार्यालय चंद्रपूर यांचेकडे तक्रार करावी.**

अतिवृष्टीमुळे वेळापत्रकामध्ये बदल झाल्यास त्याची सुचना https://maharashtracdhg.gov.in/mahahg/enrollmentadd.php या संकेतस्थळावर वेळोवळी देण्यात येईल त्यामुळे उमेदवारांनी सदर संकेतस्थळावरील सुचनांकरीता अद्यावत रहावे.

मा.जिल्हा समादेशक होमगार्ड तथा
अपर पोलीस अधिक्षक चंद्रपूर यांचे आदेशान्वये